कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/२०२५–२६/१७८५
दि. ०४/०२/२०२६

## कृपया प्रसिध्दीसाठी

प्रख्यात गायिका व संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त पद्मभूषण श्रीमती शोभा गुर्टू यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी त्यांच्या शिष्या श्रीमती अदिती बॅनर्जी, पुणे यांच्या गायनाची मैफल रविवार दि. ८ फेब्रुवारी २०२६ सायं. ५.०० वाजता कला अकादमीच्या कृष्ण कक्षात आयोजित करण्यात आली आहे.

पुणे स्थित श्रीमती अदिती बॅनर्जी यांनी सुरवातीची तालीम रविंद्र सगीत मधून निलमाधव सिन्हा व ग्वालियर घराण्याचे एल. के. पंडित यांच्याकडून घेतली. तसेच श्रीमती शोभा गुर्टू यांच्याकडून सुमारे १४ वर्षे त्यांना मर्गदर्शन लाभले. दिल्ली विद्यापिठाच्या पदव्युत्तर पदवी परिक्षेत संगीत विभागातून प्रथम येण्याचा सन्मान त्यांनी प्राप्त केला आहे.

श्रीमती अदिती बॅनर्जी या आकाशवाणी आणि दूरदर्शन यांच्या "अ" श्रेणितील मान्यता प्राप्त गायिका कलाकार असून ख्याल, टप्पा, ठुमरी, दादरा, चैती, होरी व बरहमासा अशा विविध शैली सादरिकरणात त्यांचा हातखंड आहे.

या कार्यक्रमासाठी त्यांना तबला साथ श्री. उदय कुलकर्णी व संवादिनी साथ श्री. वसंत गांवकर यांची लाभणार आहे.

संगीतप्रेमी रसिकांनी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहावे, असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतःफोटो

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)